CMYK

२० वा सामना

मुंबई इंडियन्स वि.रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु

वेळ : ७.३० वा. स्थळ : मुंबई

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड



सोलापूर शहराचे तापमान

कमाल तपमान ४१.४

किमान तपमान २५.४

www.surajyadigital.com । सोमवार, दि. ७ एप्रिल २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : १८८ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# उन्हाळ्याच्या होरपळीत सांगोला-माळशिरसचे पेटले पाणी

# पाटील अन् मोहिते-पाटलांमध्ये शाब्दिक युद्धाच्या जोरदार उकळ्या



- शहाजीबापूंचे खासदार धैर्यशीलभैय्यांना उलट आव्हान
- अकलूजकरांच्या उत्तराची आता जिल्ह्याला प्रतिक्षा
- पेटलेले पाणी विझविण्यासाठी कोण फुंकर घालणार याचे जिल्ह्याला औत्सुक्य

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**उन्हाची धग प्रचंड जाणवतेय. पारा ४१.४ ला गेला आहे. जिल्ह्यातील शेतशिवारात पाण्याचा मुद्दा 'कळी'चा बनतोय. उष्णतेच्या धगीने पिके जागीच होरपळताहेत. पाण्याचा प्रश्न जिल्ह्यात गंभीर झाला आहे. अशातच पिलीव-माळशिरसचे पाणी चांगलेच पेटले आहे.अकलूजकर मोहिते-पाटील आणि सांगोलकर पाटील यांच्यामध्ये शाब्दिक युद्ध सुरु झालंय. या उभतांमध्ये आरोप-प्रत्यारोपांचे तोफगोळे जणू जोरदारपणे फुटताहेत. त्याच्या ठिकऱ्या मुख्यत्वे, सांगोला, माळशिरस तालुक्यासह संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात उडताहेत. माजी आमदार शहाजी पाटील यांनी माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांना आता पुन्हा पाण्यासंबंधी आव्हान दिले आहे. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांनीच पाणी अडविल्याचा गंभीर आरोप पाटील यांनी लावला आहे. त्यासाठी त्यांनी पाण्यासंबंधीच्या माहिती समोर केली आहे.**

विशेषत्वे, माजी आमदार पाटलांच्या गंभीर आरोपांवर अकलूजकर मोहिते-पाटील परिवाराच्यावतीने खासदार धैर्यशील मोहिते-पाटील काय उत्तर देतात, याकडे जिल्ह्याचं पुन्हा लक्ष लागणार आहे. पाण्याचा पेटलेला मुद्दा विझवायला कोण फुंकर घालणार? पाण्याचा ताणला जात असलेला मुद्दा देशमुख आणि मोहिते-पाटील हे आणखी किती ताणणार? यासंबंधीचं औत्सुक्य उभ्या सोलापूर जिल्ह्याला असणार आहे.

पाणी अडविणाऱ्या खासदाराला तुम्ही निवडून दिलं आणि पाणी देणाऱ्या माणसाला तुम्ही घरी बसवलं, असे सांगून 'काय पाप केलं तुम्ही असे' असे म्हणून स्वतः च्याच थोबाडीत मारून घेणारे माजी आमदार शहाजी पाटील यांनी आता माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्यावर गंभीर आरोप केला आहे. माळशिरस तालुक्यातील पिलिवला मी मिळालेले पाणी विजयसिंह मोहिते-पाटील यांनी घालविण्याचे काम केले आहे, त्यामुळे धैर्यशील मोहिते-पाटील यांनी माझ्यावर आरोप करू नयेत, असे उलट नवे आव्हान शहाजी पाटलांनी मोहिते-पाटील यांना दिले आहे.

माजी आमदार पाटील म्हणाले, तोंडात मारून घेणे, हा पश्चातापाचा भाग होता आणि तो सर्व जनतेला माझा हेतू कळालेला आहे. खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांची प्रतिक्रिया मी पाहिली आहे. त्यात त्यांनी पाण्यासंदर्भात आम्ही कुठं अन्याय केलेला नाही. उलट शहाजी पाटील यांनीच माळशिरसचे पाणी पळविले आहे, असे म्हटले आहे.




(स्व.) गणपतराव देशमुख यांनी २००१ मध्ये उजनी धरणाच्या सांगोला तालुक्यासाठीच्या पाणी योजनेची प्रशासकीय मान्यता घेतली होती. त्यानंतर २००५ मध्ये काँग्रेस आघाडी सरकारने ही प्रशासकीय मान्यता रद्द केली. खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी २००१ चे प्रशासकीय परिपत्रक काढून बघावे. पिलिवच्या महालिंगरायाच्या टेकडीपासून पाणी देण्याचे धोरण होते. या टेकडीपासून सांगोला विधानसभा मतदारसंघाला म्हणजेच संगोला तालुका आणि माळशिरस तालुक्यातील पिलिव भागाला सुमारे ३. ८१ टीएमसी पाणी देण्याचं ठरलं होतं, असेही शहाजी पाटील यांनी म्हटले आहे. तत्कालीन जलसंपदा मंत्री महादेवराव शिवणकर यांनी मला सांगोला तालुक्यासाठी ३. ८१ टीएमसी पाणी दिलं होतं. उर्वरीत ३. ८१ टीएमसी पाणी जिल्ह्यातील राहिलेल्या तालुक्यांना होते. पण, विलासराव देशमुख मुख्यमंत्री झाल्यानंतर १.८१ टीएमसी म्हणजेच जवळपास दोन टीएमसी पाणी हे धाराशिव जिल्ह्यातील परांडा तालुक्याला नेण्यात आले. दोन टीएमसी पाणी हे सांगोला तालुक्याला देण्यात आले.

## विजयदादांनी लढाच दिला नसल्याचा गंभीर आरोप

सांगोला आणि पिलिव भागाचे १.८१ टीएमसी पाणी परांड्याला नेण्याचा निर्णय झाला, त्यावेळी विजयसिंह मोहिते-पाटील हे राज्याच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री होते. मंत्रिमंडळाच्या बैठकीत विजयसिंह मोहिते -पाटील यांनी पिलिव भागाच्या पाण्यासाठी कोणताही लढा दिला नाही. त्यांनी त्या भागासाठी पाणी मागितलं नाही. पिलिव भागाचे पाणी घालवण्याचे खरं काम हे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांनी केले.

## शहाजीबापू पाणी घालविण्याच्या मुद्यावर ठामच

खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी माझ्यावर पिलिवचे पाणी पळविण्याचा आरोप मुळीच करू नये. उलट मी पिलिवसह पाणी मागितलं होतं. मला ते मिळालंही होतं. पण, मी मिळविलेले पाणी घालवण्याचे काम मोहितेपाटील यांनी केले आहे, असा गंभीर आरोपही शहाजी पाटील यांनी केला.



## दोन वाहनांच्या धडकेत आयशर चालक ठार; पाकणी जवळील घटना

✔ **सोलापूर** : सोलापूर-पुणे महामार्गावरील पाकणी येथे समोरच्या वाहनाला पाठीमागून धडकल्याने आयशर चालक गंभीर जखमी होऊन उपचारा दरम्यान मरण पावला. हा अपघात शनिवारी रात्रीच्या सुमारास घडला.

बसवराज कल्याणी हसनाबादे (वय ४५ रा.देवणी जि.लातूर) असे मयत झालेल्या ड्रायव्हरचे नाव आहे. तो शनिवारी रात्री बाराच्या सुमारास सोलापूर येथून मोहोळच्या दिशेने चारचाकी आयशर घेऊन निघाला होता. पाकणी ब्रींज जवळील वासुदेव हॉटेल जवळ समोरील वाहनास आयशर धडकल्याने तो गंभीर जखमी झाला होता. त्याला ॲम्बुलन्समधून शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो रविवारी सकाळी मयत झाला. या अपघाताची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.



## राम जन्मला ग सखे

**सोलापूर : सोलापूर शहरातील पूर्व विभाग श्री राममंदिरात रविवारी रामनवमीनिमित्त पाळणा सोहळा पार पडला. यावेळी हजारो महिलांनी राम जन्मला गं सखेचा जयघोष केला.**

## सांगोला शहराजवळ वारकऱ्याचा अपघाती मृत्यू


✔ सांगोला/प्रतिनिधी

मिरज-पंढरपूर रोडवर सांगोला शहराजवळ अपघातामध्ये वारकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. (वय ६५, रा. करड्याळख ता. कागलख जि.कोल्हापूर) असे त्या वारकऱ्याचे नाव आहे.

चैत्रवारीनिमित्त पंढरपूर येथे करड्याळ गावातील श्री विठ्ठल रखुमाई पायी दिंडी भक्त मंडळाने आयोजित केली होती. त्यात बंडु जाधव प गावातील ३६ लोक पायी पंढरपूरच्या दिशेने निघाले होते. ६ एप्रिल रोजी सकाळी सातच्या सुमारास मिरज सांगोलारोडच्या माऊली हॉटेलच्या बाजूला सर्वजण चहा पाण्यासाठी थांबले होते. त्यावेळी अचानक एम. एच.१०. डी. व्ही.२२७२ ही कार रोडच्या साईड पट्टीवर येवुन बसलेले दिंडीतील वारकरी चुलते बंडू गोपाळा जाधव यांना धडक देवुन न थांबता पुढे निघुन गेली. यात त्यांचा मृत्यू झाला. पुढील तपास पोलीस करत आहेत.

## पारा ४१.४ अंश; सोलापूरकरांची होरपळ

✔ सोलापूर/प्रतिनिधी



गेल्या चार-पाच दिवसानंतर रविवारी सोलापूरच्या कमाल तापमानात पुन्हा वाढ झाली. पारा ४१.४ अंशसेल्सिअसपर्यंत गेला होता. शनिवारचे तापमान ३८ अंशसेल्सिअस इतके होते. त्यामुळे सोलापूरकरांना दिलासा मिळाला होता.त्यातच ढगाळ हवामान होते. रविवारी मात्र पारा एकदम चढला. उन्हाच्या चटक्यांनी सोलापूरकरांची होरपळ झाली. राज्यात पावसाचा अंदाज दिलेला असतानाही सोलापुरात पाऊस पडला नाही.पाऊस पडला असता तर तापमान अजून खाली आले असते. पारा चाळीशीच्या पुढे कायम राहिल्यास सोलापूरकरांना चटके सहन करावे लागणार आहेत. आठ दिवसांनी तापमानात वाढ झाली आहे.

## नाल्यातील घाण पाण्यात पडून इसमाचा मृत्यू

✔ **सोलापूर** : दारूच्या नशेत नाल्यातील घाण पाण्यात पडल्यामुळे ३५ वर्षीय इसम मरण पावला. ही घटना शनिवारी सायंकाळच्या सुमारास उघडकीस आली. लक्ष्मण श्रीमंत अस्वले (वय ३५ रा. रेवणसिध्देश्वर नगर मोतीबाग) असे मयताचे नाव आहे. शनिवारी दुपारी चारच्या सुमारास विजापूर नाका झोपडपट्टी क्रमांक १ येथील रस्त्याच्या पुलाखाली असलेल्या पाण्यात एक अनोळखी इसम पडल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्याप्रमाणे पोलिसांनी घटनास्थळी जाऊन घाण पाण्यातील मृतदेह बाजूला काढले. आणि त्याच्या चेहरा स्वच्छ केले असता त्याची ओळख पटली. मयत लक्ष्मण अस्वले हा विवाहीत असून तो मजुरी करीत होता. त्याला दारूचे व्यसन होते. काही दिवसापूर्वी त्याची पत्नी माहेरी निघून गेली होती. घटनेच्या आदल्या दिवशी तो नशेत घराकडे जाताना नाल्यात पडून मयत झाला. याची प्राथमिक नोंद विजापूर नाका पोलिसात झाली.

## लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या तरुणीस मारहाण

✔ **सोलापूर** : लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या तरुणीला तरुणाने लाथाबुक्क्यांनी मारहाण करून दमदाटी केली. ही घटना ५ एप्रिल रोजी बसवेश्वर नगर नई जिंदगी येथे घडली. याप्रकरणी सभा रिहान इनामदार (वय-२४, रा. बसवेश्वर नगर, नई जिंदगी) हिने एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.तिच्या फिर्यादीवरून तौफिक महिबूब शेख (वय-२४, रा.नई जिंदगी) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. सभा इनामदार हिची गल्लीत राहणाऱ्या तौफिकशी मागील दोन वर्षांपूर्वी तोंड ओळख होऊन मैत्री झाली होती. मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले, तेव्हापासून दोघे लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये रहात होते. तौफिक हा सभा कडे अधून मधून येत होता. त्याने सभा इनामदार हिने फोन उचलला नाही म्हणून घरी येऊन चारित्र्यावर संशय घेऊन शिवीगाळ करत मारहाण केली. तपास पो.हे.कॉ. पवार हे करीत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



'शुद्ध' कुठे आहे?

# उड्डाणपुलांच्या सुधारित प्रस्तावासाठी ९६६ कोटींचा निधी मंजूर

## पालकमंत्री, आ. कल्याणशेट्टी अन् आ.कोठे यांच्या प्रयत्नांना यश

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**सोलापूर शहरातील उड्डाणपुलांच्या सुधारित प्रस्तावासाठी ९६६.२४ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात आल्याची माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. उड्डाणपुलाच्या कामाला सुरुवात होण्याकरिता पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि आमदार देवेंद्र कोठे यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.**





२०१५ साली सोलापूर शहरासाठी जुना पुणे नाका ते पत्रकार भवन तसेच जुना बोरामणी नाका ते पत्रकार भवन असे दोन उड्डाणपूल मंजूर झाले आहेत. उड्डाणपूल मंजूर होऊन ९ वर्षे उलटली तरीही तांत्रिक कारणांमुळे उड्डाणपूल बांधण्याच्या कामाला विलंब लागत होता. नुकत्याच झालेल्या नागपूर अधिवेशन काळात आमदार देवेंद्र कोठे आणि आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची नागपूर येथे भेट घेऊन उड्डाणपुलांच्या कामासाठी निधी आणि इतर बाबींची पूर्तता करण्याची मागणी केली होती. तसेच आमदार देवेंद्र कोठे यांनी अधिवेशनात उड्डाणपुलांबाबत लक्षवेधीही मांडली होती. ९०% भूसंपादन आणि निविदा प्रक्रिया होऊनही दोन्ही उड्डाणपुलाचे काम अद्याप सुरू झालेले नाही. ते कधी सुरू होणार ? असा प्रश्न आ. कोठे यांनी अधिवेशनात लक्षवेधीच्या माध्यमातून उपस्थित केला होता. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत शहरातील दोन्ही उड्डाणपुलांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले होते. पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार देवेंद्र कोठे आणि आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पाठपुराव्यामुळे दोन्ही उड्डाणपुलासाठी ९६६.२४ कोटी रुपये दिले आहेत. आता उर्वरित भूसंपादन आणि तांत्रिक बाबींची पूर्तता झाल्यानंतर उड्डाणपुलांच्या निर्मितीची प्रक्रिया मूर्त स्वरूपात येणार आहे. उर्वरित भूसंपादन पूर्ण करुन मेअखेर सुधारित निविदा निघणार आहे, असे दिल्लीस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी महानगरपालिकेला कळवले आहे.

### मुख्यमंत्र्यांनी दिलेला शब्द पाळला



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सोलापूरकरांना दिलेला शब्द पाळत उड्डाणपुलांसाठी ९६६.२४ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे. त्याबद्दल दोघांचेही आभार.याकामी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनीही शासनाकडे पाठपुरावा केला. यासर्वांचे समस्त सोलापूरकरांतर्फे आभार.

**-देवेंद्र कोठे, आमदार, शहर मध्य**

CMYK